# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परिक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल :director.boee@unigug.ac.in


जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./२४४८/२०२५

दिनांक : १८/०८ /२०२५

## परिपत्रक

**विषय:– सर्व विद्याशाखांच्या सर्व अभ्यासक्रमांशी संबधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ साठी विशेष बाब म्हणुन तात्पुरता प्रवेश सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत.**

**संदर्भ :– दि. ११/०८/२०२५ रोजी झालेल्या विद्या परीषदेची सभेचा निर्णय**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सर्व विद्याशाखांच्या सर्व अभ्यासक्रमांच्या प्रथम/व्दितीय/तृतीय/चतुर्थ वर्षासाठी केवळ शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मधील हिवाळी सत्र – २०२४ आणि उन्हाळी सत्र २०२५ परीक्षेमध्येच अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रथम ते तृतीय, व्दितीय ते चतुर्थ आणि तृतीय ते पाचव्या वर्षामध्ये प्रवेश घेण्यासाठी विशेष संधी देण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१. केवळ शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मधील हिवाळी सत्र – २०२४ आणि उन्हाळी सत्र – २०२५ परीक्षेत जे विद्यार्थी पुढील सत्रात प्रवेश घेण्यास पात्र नाहीत, अशा सर्व विद्याशाखांच्या सर्व अभ्यासक्रमांशी संबधित विद्यार्थ्यांना पुढील सत्राकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात यावा.

२. अशा प्रकारे उपरोक्त वर्गात प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे विषम सत्राचे अभ्यासक्रम पुर्ण करण्याची जबाबदारी सदर विद्यार्थ्यांची असेल व त्याबाबतचे हमीपत्र प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांने महाविद्यालयाकडे सादर करणे अनिवार्य करावे.

३. तात्पुरता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शेक्षणिक बाबी उदा. अध्ययन, अध्यापन, प्रात्यक्षिके, सत्रकार्य, क्षेत्रभेट व इतर बाबी महाविद्यालयाने इतर नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे पुर्ण करून घ्याव्यात. त्याबाबतच्या परीक्षा व इतर बाबी या हिवाळी सत्र २०२५–२६ या परीक्षेमध्ये प्रथम/व्दितीय/तृतीय/चतुर्थ वर्षातील अनुशेषाचे विषय पुर्णत: उत्तीर्ण होऊन जे विद्यार्थी प्रचलित तृतीय/चतुर्थ /पाचव्या वर्षामध्ये प्रवेश घेण्यास पात्र ठरतील, अशाच विद्यार्थ्यांच्या सत्र ५/७/९ मधील अध्ययन, अध्यापन,प्रात्यक्षिके, सत्रकार्य, क्षेत्रभेट व इतर बाबी, परीक्षेमधील संपादणुक ग्राहय धरण्यात यावी.

४. अशा प्रकारे पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०२५–२६ च्या विषम (हिवाळी) व सम (उन्हाळी) सत्राच्या परीक्षा एकत्रित सम (उन्हाळी) सत्राच्या परीक्षांसोबत (सन २०२५–२६) घेण्यात याव्यात.

५. जे तात्पुरते प्रवेशित विद्यार्थी हिवाळी २०२५–२६ मधील परीक्षेमध्ये त्यांचे प्रथम/व्दितीय/तृतीय/चतुर्थ वर्षाचे अनुषंगिक अनुशेष पुर्ण करू शकणार नाहीत आणि प्रचलित नियमानुसार तृतीय वर्षाच्या पाचव्या/चतुर्थ वर्षाच्या सातव्या व पाचव्या वर्षाच्या नवव्या सत्राकरीता अपात्र ठरतील, अशा विद्यार्थ्यांचा तात्पुरता प्रवेश हा आपोआप रद्द होईल. त्याकरीता जमा शैक्षणिक शुल्क व इतर बाबी यांचा परतावा देय राहणार नाही.

६. सदर निर्देश अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये केवळ शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिताच लागु राहतील व या निर्देशांचा संदर्भ पुढील वर्षामध्ये घेता येणार नाही.

७. ज्या अभ्यासक्रमांस शिखर संस्थांची परवानगी असेल अशा अभ्यासक्रमांना त्या त्या शिखर संस्थांचे नियम लागु राहतील.

18/08/2025

(डॉ. प्रविण अ. पोटदुखे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी :–

१) मा.कुलगुरू महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सादर.
२) मा.प्र–कुलगुरू महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सादर.
३) मा.कुलसचिव महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सादर.
४) मा.वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सादर.
५) संगणक विभाग, गों. वि., गडचिरोली यांनी सदर अधिसुचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याकरीता सादर.
६) समन्वयक, एमकेसीएल, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना पुढील कार्यवाहीस सादर.